# अ[illegible]सिद्धा

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ........ काव्य
ग्रं. क्र. २६००



REFBK-0026015
REFBK-0026015

विनायक शहाणे

संदर्भ काव्य

# अप्रसिद्धा

विनायक शहाणे

REFBK-0026015
REFBK-0026015
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

¤

© सौ. नलिनी शहाणे

प्रथम संस्करण
१७ आठ ८९

मूल्य वीस रुपये

मुखपृष्ठ
गंगागौरी न्हावकर

मांडणी
अरुण घाटे

प्रकाशक
सौ. नलिनी शहाणे
११/६ वैभव, वल्लभबाग मार्ग,
घाटकोपर ( पूर्व ), मुंबई-४०० ०७७.

मुद्रक
भरत काते
सरस्वती प्रिंटर्स,
क्रिएटिव्ह इंड. इस्टेट,
मुंबई – ४०० ०११.

अक्षरजुळणी
प्रिंटलेझ,
अनिल शाळीग्राम
शाळीग्राम बंगला,
महापालिकेसमोर; स्टेशन रोड,
ठाणे – ४०० ६०१.

ह्या कवितासंग्रहातील गीतांचे मुद्रण, ध्वनिमुद्रण, इत्यादी
सर्व अधिकार सौ. नलिनी शहाणे यांचेकडे स्वाधीन.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६०० काव्य २६६९५
शाखा (स्थळ प्रत)

# अभिप्राय

श्री. विनायक शहाणे यांची माझी ओळख झाली ती योगायोगाने. त्यांच्या "माझे मला न ठावें" या पहिल्या नाटकाला साहित्य संस्कृती मंडळाचे अनुदान मिळाले, मला ते नाटक वाचण्याचा योग आला आणि श्री. शहाणे यांचा परिचय वाढत गेला. श्री. शहाणे हे केवळ नाट्यलेखन करतात एवढेच नव्हे तर ते कविताही करतात, असेही माझ्या प्रत्ययास आले, कारण एक दिवस श्री. शहाणे यांनी त्यांच्या कवितांची वहीच मला वाचावयास म्हणून दिली.

मनुष्य आणि पशू यांच्यातील भेद दाखविताना एका कवीने असे म्हटले आहे की, साहित्य, संगीत आणि कला यांची जाणीव माणसाला असते, पशूला नसते. ही जाणीव बहुधा उपजतच असते असे मला वाटते. परिस्थिती आणि शिक्षण यामुळे ती कमीअधिक होत असेल एवढेच. परंतु, माणूस जन्मतः हातपाय हलवावयास लागतो त्यातही एक लय, एक ताल, एक ऱ्हिदम असतो. ही लय किंवा हा ताल त्याच्या जीवनाचे अंग होऊन जाते आणि ते निरनिराळ्या प्रकारे दृष्टोत्पत्तीस येते. एखादा गवई उत्तम संगीत गात असेल, पण सामान्य माणसालासुद्धा स्नान करीत असताना गावयास सुचते. एखादा गायक एका विशिष्ट तालात गात असेल, पण ते गाणे ऐकत असता सामान्य माणूसही एक ठेका धरू लागतो. लयबद्धता व तालबद्धता ही गोष्ट माणसाच्या आयुष्याचाच एक अयुतसिद्ध असा भाग आहे. ज्याप्रमाणे लय आणि ताल माणसाला आपल्या शरीरातून निर्माण करता येतात त्याप्रमाणेच एक प्रकारची लय आणि ताल तो आपल्या मनातून म्हणजे मनात उत्पन्न होणाऱ्या भावनेच्या स्पंदनातूनही निर्माण करू शकतो, करतो. ह्या अशा भावनांच्या स्पंदनाचा आविष्कार म्हणजेच काव्य. हा भावनांचा आविष्कार ज्या प्रमाणात करता येईल आणि ज्या प्रमाणात हा आविष्कार ऐकणाऱ्याला रुचेल त्या प्रमाणात त्याचे काव्य चांगले किंवा वाईट हे ठरेल. परंतु प्रत्येक माणूस आपल्या आयुष्यात असे काव्य करीतच असतो. काव्याला नेहमीच सार्वत्रिकता येते असे नाही, पण सार्वत्रिक प्रशंसेच्या कसोटीवर काव्याचा कस मात्र ठरवला जातो. त्यामुळेच बहुधा भरतमुनींनी लोकांची रुची हीच काव्याची कसोटी मानली असली पाहिजे. "तस्मात्

लोकःप्रमाणं हि" असे भरतमुनी म्हणतात. पण सार्वत्रिकता असो वा नसो, माणसाच्या मनातून-मुखातून काव्य झरते याचाच अर्थ काव्याची बीजे त्याच्या हृदयात कुठेतरी असतातच. त्या बीजांत काय ताकद आहे ते वाचकांनी ठरवावयाचे असते. त्यावर आधीच मतप्रदर्शन करून वाचकांच्या मनात संदेह उत्पन्न करणे हे काव्यरसाला एका विशिष्ट साचातून घेऊन जाणे होईल. काव्याची अशी वाढ झाली तर काव्य कृत्रिम होते आणि समाजही कृत्रिमतेच्या दिशेने जाऊ लागतो. असे होणे योग्य नाही. म्हणून प्रस्तावना लिहिताना किंवा कोणत्याही लेखकाला आशीर्वाद देताना लोकांनी आस्वाद घेण्याचे अगोदरच "फास्ट फुडच्या" धर्तीवर आस्वादाची "एक दुधाची बाटली" वाचकासमोर ठेवणे योग्य नाही. "भिन्न रुचिर्हि लोकः" असे म्हटले जाते. ज्याची जी रुची असेल ती त्याने तपासून आपलीशी करावी. निर्मितीची प्रक्रिया आणि आस्वादनाची प्रक्रिया एकमेकांना पूरक असल्या तरी भिन्न आहेत. आस्वादनाची प्रक्रिया ही जरी रसिकांपुरती मर्यादित असली तरी काव्य निर्माण करणाऱ्या कवीपेक्षा रसिकांची संख्या अधिक असणार असे गृहित धरावयास हरकत नाही. पण निर्मितिप्रक्रियेतच निर्मात्याची खरी कसोटी लागते. वाटेल त्याला निर्मिती करता येत नाही. निर्मिती चांगली आहे किंवा वाईट आहे हे लोक सहज ठरवितात, पण त्यांना स्वतःला निर्मिती करण्याची वेळ आली तर चांगली निर्मिती करणे त्यांना जमतेच असे नाही. निर्मितीमध्येच माणसाची खरी प्रतिमा दृष्टोत्पत्तीस येते. त्यामुळेच "जे न देखे रवि ते देखे कवि" असे म्हटले जाते. एखादी गोष्ट चांगली किंवा वाईट हे टीकाकारांनी ठरवावे पण टीकाकारांना निर्मितीच्या वेदनेचा अनुभव असेलच असे नाही.

श्री. शहाणे यांच्या कविता पाहिल्या, वाचल्या, चवीने वाचल्या, पण त्या कशा आहेत याचा खटाटोप करण्याचा मी प्रयत्न करणार नाही. प्रत्येक वाचकाने तो आपल्या बुद्धीनुसार करावा असे मला वाटते. निर्मितीच्या आविष्करणाच्यासुद्धा फॅशन्स काळाप्रमाणे बदलत असतात. कालची फॅशन आज रहाते असे नाही. आजची फॅशन उद्या राहीलच असेही नाही. त्यामुळे या आविष्कारांच्या फॅशनबद्दल न बोलणेच बरे. पण श्री. शहाणे यांनी काव्य-निर्मितीचा जो प्रयत्न केला आहे त्याबद्दल मात्र त्यांचे कौतुक केले पाहिजे, त्यांना उत्तेजन दिले पाहिजे. साहित्याच्या, काव्याच्या क्षेत्रात श्री. शहाणे यांना यशस्वी वाटचाल करता यावी अशी मी परमेश्वरचरणी प्रार्थना करतो.

**सुरेंद्र बारलिंगे**
४२, यशोधन,
मुंबईः ४०० ०२१.

२ चार ८८

# प्रसिद्धीच्या उंबरठ्यावर

घडीभरच्या आयुष्याच्या प्रवासात माणसावर होणाऱ्या संस्कारांनी त्याची जडणघडण प्रामुख्याने होते. त्याची इच्छा एक असते पण प्रत्यक्ष व्यवहारात तो घडतो वेगळाच. लहानपणी कविवर्य यशवंत, गिरीश यांच्या कविता ऐकल्या. प्रख्यात नाटककार व माझे लेखनगुरू कै. शां. गो. गुप्ते, कै. डॉ. ज. के. रानडे, कै. डॉ. चारुशीला गुप्ते यांच्याशी फार निकटचा संबंध आला. सह नेते ते साहित्य–या विषयाची अमाप गोडी लागली व मंत्रालयाच्या चाकरीमुळे पेपर व "पब्लिक"शी जवळीक करणे क्रमप्राप्तच होते. पुष्कळशी माणसं काळाच्या पडद्याआड गेली असली तरी त्यांची आठवण मात्र अजूनही ताजी आहे.

"वेडेवाकुडे उदंड लिहिले–इतरांना वाचून दाविले". स्वांतसुखाय लिहिलेल्या पण प्रसिद्धीच्या झोतात न आलेल्या कवितांचा संग्रह "अप्रसिद्धा" या नावाने रसिकांना सादर करताना मला आनंद होत आहे.

"अप्रसिद्धा" या माझ्या पहिल्या कवितासंग्रहाला डॉ. सुरेंद्रजी बारलिंगे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, यांचे शुभाशीर्वाद लाभले. त्यांचा मी आभारी आहे. माझे मित्र श्री. स. ना. आपटे, महाराष्ट्र बँक, घाटकोपर, श्री. अरुण घाटे, श्री. शरदचंद्रजी कानडे, व माझे सहकारी श्री. भालराज न्हावकर यांचे प्रोत्साहनही या पुस्तकाच्या निर्मितीला कारणीभूत आहे. मी त्यांचा आभारी आहे.

या कवितासंग्रहाला साजेसे मुखपृष्ठ अल्पावधीत कु. गंगागौरी न्हावकर यानी तयार करून दिले त्याबद्दल मी त्यांचा शतशः ऋणी आहे.

या कवितासंग्रहाच्या मूल्यमापनाची जबाबदारी रसिक व चोखंदळ वाचकांवर सोपवून मी माझे मनोगत पूर्ण करतो.

**विनायक शहाणे**

११/६, वैभव,
वल्लभबाग, घाटकोपर [पूर्व],
मुंबई-४०० ०७७.
१७ पाच १९८९

# अनुक्रम


१ । काकणे किणकिणती । १

२ । माझी मानसकन्यका । २

३ । पाखरे परतली परसदारा । ३

४ । पदरव । ४

५ । मिठी । ५

६ । सदैव तुझीच । ७

७ । हेचि मागणे आता । ८

८ । मेळा । ९

९ । संपदा । १०

१० । प्रसाद । ११

११ । रम्य तो संसार । १२

१२ । संधान । १३

१३ । बोरिबंदर अने व्हिटी । १४

१४ । साठवण । १६

१५ । माझी जीवनसतार । १८

१६ । पदी माझ्या । २०

१७ । बंध रेशमाचे । २१

१८ । स्वप्न । २२

१९ । दिनपर्ण । २३

२० । रेशीमधागे । २५

२१ । कलंदर मी शिकंदर मी । २७
२२ । जागरण । २९
२३ । कसे घडले कोठे घडले । ३०
२४ । घर आणि घरघर । ३१
२५ । पान पिकलं तरी । ३३
२६ । चंद्र कलारंगाचा । ३५
२७ । उंट । ३६
२८ । बा माणसा । ३७
२९ । ओळख । ३८
३० । कृष्णेच्या प्रवाहात । ३९
३१ । एकच गाणे । ४०
३२ । बोबडे बोल । ४१
३३ । कदली वदे कुणाला । ४२
३४ । केदार बाळ माझा । ४४
३५ । अखेर मातीच माती । ४६
३६ । मन उदास उदास । ४७
३७ । चांदणे । ४८
३८ । माझी मला विसरले । ४९
३९ । कधितरी कुठेतरी । ५१
४० । अभिलेख स्पंदनाचा । ५३
४१ । टाळ मृदंग अभंग । ५५

## घरसंसार

कधी उन, कधी पावसाची झड भर गुंजभर—
कधी सावनधारा, कधी झळ उन्हाळी प्रखर—
नवग्रही रास रसभरी कर्क
मन तरुण तरुण रसिला दर्दभरा अर्क—
चाल तुझी वृश्चिकेची पडता पाऊल नकळत डसणारी—

कधी उन, कधी पाऊस, कधी शिशिर—
मनी काहूर, झपाटल्या वादळवाऱ्यासवे सदा हुरहुर
बाल्कनीतला कॅक्टस, शेजारची सदाफुली
सदा हासरी परी संसारात गुरफटलेली—
मी सदा मोकळा मोकळा आनंदयात्रिक
इथला पथिक, कुठही पाणपोईवर भिरभिरणारा—

माझ्या स्वप्नील मनाचे कंगोरे तूच जपलेस—
माझीहि पावले करतात प्रवास परतीचा रोज घरा—
सात पावलांचा करार सुखाच्या झालेला सावलीत
अगदी तीस वर्षापूर्वी येत होतो तोच वेग
अन् आवेग सदा राखलेला—

अन्न, वसन अन् निवारा आणि तू असता—
घराला घरपण तुझे माझे मीपण—मीपण—
पण परंतुचा हा संसार—अपुरा अपुरा घरसंसार— ॥

**१७ पाच ५७ पासून बत्तीस वर्षांची**
**घरसंसाराची यशस्वी वाटचाल करणाऱ्या माझ्या**
**प्रिय पत्नीस—सौ. नलूस. घरचाच आहेर.**

एक

## काकणे किणकिणती

काकणे किणकिणती—
हिरव्या चुड्यात चाचपते नव्या
सुखाचे धागे—
जुन्या आठवणी मुग्ध ओले भाव ।
त्यांची डोळयांत निशाणी—
भाळी कुंकुम कुरळया केशकलापात सिंदूर—
तिला वाटते बाजूबंद ते बेबंद मज बंदिवान करिती
नजरबंद—काकणे किणकिणती—
पणपरंतुच्या झंझावातात—
सासर अन् माहेरच्या जोडव्यात
जड होते तिची पापणी उंबरठ्यावर
मेंदीने रंगलेली पाउले. ओलांडिता माप—
होते माहेरच्या सीमेचे उल्लघन एक

दोन

## माझी मानसकन्यका

[ पाठवणी–गीत ]

माझी मानसकन्यका, चालली कुंतला
गुंतलेल्या मनातली मानसकन्यका ॥

तिच्या पायातील पैंजणांचे पदरव ।
आठवणींच्या आनंदाचे आरोह–अवरोह ।
सातसुरांच्या मैफिलीत रमली मम कन्यका ॥
माझी मानसकन्यका ॥

सुरेल शब्दांची सुसंगत गीतांची अमोल रंगत ।
गम्मत ये तिच्या संगतीत
आठवे ती बालवयातील अवखळ अंगतपंगत ।
वत्सलतेची वत्सल वीणा करित ये झंकार
मेहंदीतले ते नूपूर करित झंकार ।
तिच्या पाठवणीत चंदनाची पालखी ।
चंद्र चवऱ्या ढाळीत होता पुनवेच्या आभाळी ।
वाटेवरचे वाटसरू सुरू ही सप्तपदी
इथला प्रवास उनपावसाचा, इंद्रधनु आकाशी विराजे ।
संसारी रमली मम कन्यका ॥
माझी मानसकन्यका ॥

[ मंत्रालय
२ पाच ८४ ]

तीन

## पाखरे परतली परसदारा

पाखरे परतली परसदारा, वर्षती जलधारा ॥
पंख पसरिती प्रणयाचे,
गोकुळ नांदते वैभवाचे,
वाटते उगाच वर्षती घनधारा ॥१॥

ओलेचिंब पंख फडफडती
विजा त्यातच कडकडती,
वाटते चल जाऊ उंच भरारा ॥२॥

दारात उभी धेनु सुंदरा,
बिलगुनि पाहुनी उभी वासरा,
वात्सल्याचा वनी वाहतो विंझणवारा ॥३॥

[ पुणे प्रवास
२२ नऊ ७० ]

चार

## पदरव

अवचित येता पदरव कानी
निळेजांभळे स्वप्नयान उतरते
मी त्यात श्रांतलेला
ओठंगून तू उभी राहशी
करावया स्वागत माझे मुक्या भावनांनी
आठवतात ते गुंतलेले कर तव करपाशी
गुंतलेल्या गीतांच्या
ओळी तव कुरळ्या कुंतली
झरझर झरझर झरते झरणी
चिरस्मरणीचे निखळता मणी
आठव ते मेघ पांढरे
अवनीची भिजलेली वसने
ओठंगुन तू अशी उभी का?
थकतिल ना तुझी पाउले—
मग येशील ना घेऊन ओठावरची साय
हाय हाय ते गूज संपले—रातपानांच्या शालीत लपलेले
मी हरवलो तुझ्या संगे

[ कोसबाड
९ बारा ६८ ]

पाच

## मिठी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६००
काव्य २६०७५
७/१२५८९
शाखा

तू दूर दूर,
जवळ तुझ्या मी ऐलतीरावर
तू भाववैखरी,
मी गीतनिर्झर—
उगाच खळखळणारा
दाटीवाटीने चालणारा पैलतीरावर

तू गोकुळची भोळी राधा—मी माधव
ये झंकारित नूपुर—
माळुनि सुरंगी सजविण्या
प्रणयाचे गोपुर

उघड तुझे कवाड कल्पनांचे
अपुरे गीत माझे विकल वेदनांचे
मेखला तू बेबंद बंदिवान मी
आयुष्याच्या पदपथावर—
अप्रमेय प्रतिमांची रणरागिणी तू
अनुनय अन् चिरशब्दांचा शृंगारराज मी
आयुष्याच्या प्रगतिपथावर—

गतिमान तू अगतिक मी
अविरत तू रिता परी मी
ओंजळीत माझ्या ओल्या आठवांची
सोडत करण्या तरी ये—

वसंत गेला वर्षा सरली
मृद्‌गंध सरता उरली माती
निशाणी ठेवण्यापुरती तरी
ये शब्दांच्या मिठीत माझ्या

आयुष्याच्या उत्तर सीमेवर—
पारिजात ओसंडतो आसवे
चाहुल येता शिशिराची
गेला उषःकाल साजणी
उसासे अन् मीलनाचे ठसे
ठेऊन तुझ्या गाली

मदनिका दूर होता मदन लाजला
निसवली दुपार रणरणत्या उन्हात
प्रसवली संध्या
उरली चिरगुटे लाल रक्तिमेची
प्रणयपथावर—

वेळ अपुरा, डाव अपुरा
स्वप्न अधुरे, गीत अर्धे—
अपूर्ततेत अपूर्वाई
आणण्या तरी ये उत्तररात्री—
चोरपावलांनी—उरल्या सुरल्या
सरत्या शरण मार्गावर—

चिरनिद्रेची चिंता नुरली
तव मिठीत आयुष्याची
प्रणयगाथा विसावली ॥

[ वांद्रे
दसरा, २३ दहा ६६ ]

¤

सहा

## सदैव तुझीच

मनात माझ्या चित्र तुझे
पत्र येता तव, वेदना वेडावते
भावना बिलगतां होते वेदना—

म्लानवदना तू बिसतंतूंनी वेढलेल्या वेणा
अवचित येता अमराईतून वास मोहोराचा
डहाळता आम्रतरू मनोविकारांचा हलतो हिंदोळा
त्या हिंदोळ्यावरची राणी गाते गाणी
विरहवेदनेची उरली एक कहाणी—

वणवण फिरुनी येता
थबकती पाउले, पाहुनिया तुज दिवास्वप्नी
स्वप्नातले चोरटे चुंबन—
जाहले शब्दरूप—सजला स्वरराजशृंगार—
भाव नयनातले, हितगुज अंतरातले
सतार छेडित स्वप्नवीणेची
ये आठवांच्या वेगे—
दोन शब्द लाजरे—पुरे त मजला
'सदैव तुझीच'
सदैव तुझीच—

सात

## हेचि मागणे आता

आम्ही आनंदाचे सैनिक, सेवासाधक । इहलोकी ।।

अवघ्या आनंदाचा क्षण, क्षणकणिकेचा एक कण ।
क्षणाकणांचा सुखसंगम जाहला, इहलोकी ।।

आवडीने चिदानंदा आळवितो ।
आनंदे चिदानंदासंगे नांदतो, आनंद चिन्मय
जाहला, इहलोकी ।।

राउळात राधा रमते, मनोमंदिरी माधवाते सुखविते ।
राधाभाव माधवमय जाहला, इहलोकी ।।

एक क्षण, अनेक क्षण, क्षणैक जीवन ।
एक कण, अनेक कण, क्षणाकणांचे संजीवन ।
संसारी सुखसागर उसळला, इहलोकी ।।

सोडिला पांगुळगाडा सरली पायपीट ।
बा पुंडलिका दे घडिभरी तुझी वीट ।
बा पांडुरंगा गाईन तुझे गीत अभंग अवीट ।
चालली ही निशिदिन तुझी दिंडी, इहलोकी ।।

[ घाटकोपर
गुढीपाडवा, २ चार ८४ ]

आठ

## शंखशिंपेचा संसारी मेळा

शंखशिंपल्या गोळा केल्या
शुभदसुमांच्या माळा रचिल्या
राम नाही राउळात, उरी उरला उमाळा । गोपाळा ॥

अंगतपंगत वात्सल्याची,
रंगत रांगते वैभवाची,
नयनशिंपलीत हले मायमानस हिंदोळा । गोपाळा ॥

नऊ

## संपदा

केव्हा येणार संपदा
लक्षुमी हीच आपदा
कनक, कांता कारण जयाचे
रण माजते इथे सदैव पराजयाचे—
शिरी घेऊनी येई विपदा ।।

हीच माझी संपदा । हीच माझी संपदा ।।

[ दादर
२ दहा ४९ ]

दहा

## प्रसाद

प्रसादात पाहिला भगवंत ॥

एक दिस आला,
दोन दिस इथे राहिला,
समय संपता ठरल्या वेळी गेला,
अविरत फिरत्या रथचक्रात वसे भगवंत ॥१॥

एक चाक सुखाचे जवाएवढे ।
दुजे चक्र दुःखाचे मेरुएवढे ।
तिजे चक्र सरत्या शरणमार्गाचे ।
सुखदुःखाच्या चालनाचा नेमिक्रमवंत भगवंत ॥२॥

अकरा

## रम्य तो संसार

रम्य तो संसार, पावन रुचिर ॥
प्रीतिचा एक पराग , इहलोकी ॥

आनंदाचे नंदनवन, मंगलायतन ।
शांतिसुधेचे अमृत, इहलोकी ॥

हृदयींच्या राउळी, देवता ही भोळी ।
पहुडली प्रीतिपर्यंकी, इहलोकी ॥

तिला दुखाःची आण, आनंदाची खाण ।
सुखसागराचे निधान, इहलोकि ॥
दयेचा मंदार, प्रेमाचे जो आगर ।
रम्य तोचि तो संसार, इहलोकी ॥

[दादर
२ दहा ५० ]

बारा

## संधान

संधान बांधले तुजपाशी,
जवळ असुन नकळत दूर राहिले—
विरह दाटता उरी,
आठवांचा अधरी हलतो हिंदोळा

हवे हवे मज जे वाटते—
मजपासून अवचित दूर जाते—
सातसुरांचा सुंदर आशय—
सात पावलांचा आठव—

सान सोबत सरली,
सहवासाचे सुंदर स्वप्न सरते—
हृदयीच्या राउळात
एक भग्न मंदिर उरते—

मदनिका, रदनिका
स्वप्नगंधा, रजनीगंधा
मत्स्यगंधा लवंगिका, एक ना अनेक
स्वप्नसुंदरींचे एक सान यौवनयान—
ओठावरल्या आठवात
हरपले तुझे माझे भान—बेभान ॥

तेरा

## बोरिबंदर अने व्हिटी

एक घाईगर्दीची संध्या—
खास बसच्या क्यूचं शेपूट
'योगक्षेमा' पर्यंत मारुतीच्या शेपटासारखं वाढतंय
माझ्या पुढं लांबसडक केशसंभारांची
टंच मृगनयना त्याला कुरवाळतीय—

हवेत गारवा आलाय मी मात्र उगीचच गरम होतोय—
अंतर आहे एक मीटर—
विरहान वाढतं प्रेम—घरी जायचंय
आज मात्र तिची अनिवार आठवण होतीय

काही कळत नाही—फक्त नकळत वळत
वळत जाय पायवाट—
तिच्या पायाकडं लक्ष जातं
मेहंदीनं रंगलेली केतकी—
केतकीला सुगंध पारिजाताचा मंद मंद मरंद
तिचा पदर ढळतोय—टंच कंचुकी मला चाळवतीय

माझं मन जुन्या आठवणी चाळवतं
वणवण फिरतंय माझ्या विशीत
विशीची वेस ओलांडली—
तरीही यमुनाकाठी ताजमहाल आहे ना

अजून—जून असून अजुन—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

उभा आहे. यमुनाकाठी—
मी मैफिलीचा बादशहा
ती इष्कमस्तानी रतिमदनानी
गालावर गुलाब फुलतात—
शराबी नयनांत माझ्या काटे रुपतात—

अन् कळत नकळत
एक गाडी येते हंसी झटकन् वेगानं
निघून जाते—हाय हाय—
बस नाही—टॅक्सी परवडत नाही.
बस करा—आपली पायगाडी आहे ना
पायपीट पायपीट—
लेफ्ट राईट लेफ्ट राईट बोरिबंदर
बोरिबंदर—व्हीटी अने बोरिबंदर—

[ २८ तीन ८४ ]

चौदा

## साठवण

काल सकाळी दरवळत आला गंध गुलाबाचा—
गजरा माळीत माळीत आली मोगरीचा—
शालीत उबदार आठवांची खुली कवाडे
नीरव शांततेत निजली चोचीवर चोच टाकुनी
प्रणयप्रतिमांची  कबुतरे
गुटर्र गुम गुटर्र गुम— गाडी चाललीय धक् धक्
धक् धक् ॥

अशा समयी पायातील पैंजणांचा पदरव कानी येतो—
एक फुललेली गुलाबाची कळी डोकावून गेली
आता उरलीत आठवांची मिटलेली दारे
झाकपाक करणारी हरवलीय— विरलेत वारे
माझ्या शराबी नयनांत— नयन शराबी, गाली गुलाबी
मिसळली शराबी नयनांत गुलछन गुलाबी
वेळेला अवसर नव्हता— मनाला अडसर कसला
काळ, काम, वेगाच्या गणितात
एकाकीपणाच्या अंतरात कुणीतरी डोकावू पहात होतं.
गाडीनं शिटी दिली आगीनगाडी धावू लागली—
धडानधड— धडानधन— धकधक ॥

पदरावरील मोरपंखी नाचत होती
प्रेमपराग वल्लरीचे वेलावर झेपावत होते
हिरवीगार शेतं धावत होती उसाट—
पिसाटलेल्या मनाला मोहवून गेली ती—

चंचल नयनांचे नेत्रकटाक्ष पुसटलेत—
पुसट होत होत्या त्या खुणा—

पुढील स्थानकावर गाडी थांबली—
मीही थांबलो होतो पुष्पपरागांच्या
उषेच्या उबदार सावलीत— नयनोत्सुका मीलनोत्सुका
गुलाबी गुलछनसकट पैंजणांचे पदरव
आणि काही कळ्या मोगरीच्या
मागे ठेवून उतरून गेलीय—कुठंतरी—कधीतरी
थांब्यावर थांबायचंय—

हाय हाय... आनंदाचे क्षण येतात आणि जातात.
पैजणांचे पदरव फक्त स्वप्नील मनात साठतात—
आठवणींची साठवण करून उरतात.

[ मुंबई-नागपूर प्रवास
१४ अकरा ८४ ]

¤

पंधरा

## माझी जीवनसतार

ध्वनि ते दिडदा, दिडदा, दिडदा...

माझ्या जीवनसतारीचे सात सुरांचे सुरेल जीवन—
माझी सतार मज समजावते, हेही दिवस जातील—
गीतांचे बोल ओठावर तसेच राहतील—
कुणास्तव कुणीतरी—कधीतरी कुठेतरी
कुणाची किणकिणेल सतार—दिडदा—दिडदा

मी वारकरी प्रणयपंढरीचा—
पथिक विराण वाटेवरचा—
वास्तवात नसता गुलमोहर—मनात
फुलली बोगनवेल—रुणझुणले पैंजण
कळत नकळत मनातले चांदणे तिच्यात
सामावलेले पाहतो नयनकोंदणात.
चैत्रबनात तिच्या पदराआडचा चंदनगारवा—
सतारीच्या बोलातून सरला राग
अनुराग सखीचा राग गे मारवा
अबोल जाहली जरी सतार
तरी ध्वनिमुद्रेतला दिडदा, दिडदा—दिडदा

माझ्या मनातला राजहंस
असतो कुठंतरी भटकत भरकटत
भरकटणाऱ्या मानसमंदिराची
कधी असतात भग्न कवाडं—

अंधारलेल्या जीवनात कधीतरी येते
झुळूक त्या गवाक्षातून—
गवाक्षात केशकलाप सोडून उभी असते
स्वप्नातली शर्वरी—
रात सारी सारी आठवांच्या मागे मारिते भरारी—
उरली हाती सतार किणकिणती
ध्वनि ते दिडदा...

आम्ही त्या प्रतिभामंदिराचे सेवक सारे
पायी सारी वणवण—उरी उधाण—
उधाणातले मंदिर चिरेबंदी—नाही आम्हा
चिरनिद्रेची क्षिती—आमुचे क्षितिज
असीम—असीम आम्ही—नाही आम्हा
परिसीमा—आम्ही जातो आमुच्या
सतारीसंगे ध्वनि ते दिडदा-दिडदा—दिडदा ॥

[ घाटकोपर
२२ चार ८४ ]

¤

सोळा

## पदी माझ्या

पदी माझ्या नूपुर किणकिणले ।
अपार प्रणयाच्या राउळात मी विसावले ।।

नूपुर माझे साथी, माझी सरगम
गळयातला गांधार, वाजे प्रीतीचा पडघम ।
आनंदाच्या वेडात विसरले छुमछुम छुमछुम
कोषात गुंतलेल्या आठवात भान मम हरपले ।।

पुष्पपराग तो उधळित आला उधाणवारा ।
वाऱ्यात मिसळला चंदनगारवा, हसरा मारवा ।
गारवेलीस बिलगता मारव्यात मृद्‌गंध मिसळले
विसरले विसरले, माझा शिणगार विसरले ।।

प्रिया मी तुझी कुरंगनयना
प्रणयिनी मी ओठंगून उभी म्लानवदना ।
कल्पनांची कवाडे सताड उघडी सजणा ।
प्रणयाच्या गोपुराचे सांजदीप उजळले
पदी माझ्या ।।

[ ६ सहा ८४ ]

सतरा

## बंध रेशमाचे

भावनांचे बंध भावगीतात साकारले
पुष्पपराग उधळीत आले आले ।।

पुनवेची ती रात चांदणी
मिटली कळी, मिटली पापणी ।
कूस बदलत असता
आठवांनी तुझिया मन मोहोरले ।।१।।

काकणे किणकिणता—
दिवा मिणमिणता—
आठवता आता त्या आणाभाका
भंगल्या स्वप्नकोषात अभंग राहिले ।।२।।

सात सुरांची सरता सरगम—
मधुस्वप्नातले सरले नर्तन—
आठवांची गालावरी निशाणी
नव्या संसारी नवी कहाणी घडते ।
आठवांचे गीत ओठी उरले ।।३।।

[ ३ नऊ ८४ ]

अठरा

## स्वप्न

लाडके ते स्वप्न माझे घेऊन जाऊ नको ।
स्वप्नातल्या कुंदकळ्यांना फुलवू नको ।।

स्वप्नमंजुषा ही बिलोरी ।
कुणास्तव कुणीतरी गाता लोरी ।
शब्द तुझे स्वर माझे, भिरभिरती नजर लाजरी ।
लजवंतीला उगाचच लाजवू नको ।।

मनी वसले ते मज स्वप्नी दिसले ।
मौन नुपूर, गीत अपुरे असून मी गायिले ।
स्वप्नकोषातल्या मायमिठीत माझी मला विसरले ।
लाजरीच्या वेलीस हात तू लावू नको ।।

माहेर सरता, नवजीवन नवे सासुर ।
माहेर-सासर एक जाहले प्रणयाची एक पाखर ।
भाव मनींचे, गीत गाता आनंदा नुरला आवर ।
स्वप्नातल्या शयनमंदिरात दीप तू लावू नको ।।

[ घाटकोपर
२३ दोन ८४ ]

एकोणीस

## दिनपर्ण

बावन्न पत्त्यांचा डाव रंगला—
रंगीबेरंगी दुनियेत
रंगात श्रीरंग दंगला—

अंगप्रत्यंगात अनंत रंग
सुखनिवासी माझ्या सात स्वरांची सरगम
कधीमधी गम
'क्या खाना' खाने का गम, नही पिना रम

आयुष्याच्या हमरस्त्यावर
गळून जातात दिनपर्णे—
दिवास्वप्नांचा होता पालापाचोळा
पिवळ्या पानगळीत हरिततृणपर्णेही घेती विसावा

विचित्रवीणा तो वाजवीत आहे
वीणेसंगे सतारिया अन परववाजी घुमत आहे—
सकाळ, दुपार अन् संध्याकाळ
काळ अनंत अपुरा वेळ
बावन्न पत्त्यांचे डाव—एक डाव
केव्हा तरी सोडून जायचाय अपुरा डाव

'जून' असून अजून
पावलं टाकायचीत जरा जपून—
'कॅट' टाकला जुना
पानदानात नवा रत्नम चुना, नवी इलायची

नव्या लवंगा—
पान कळीदार, रंगला ओठी विडा
नवा डाव मांडिला—

रंगला हात मेंदीचा मेंदीच्या मोहाने वेडावला हिरवा चुडा—
माहेर-सासुर जोडिती पायातील जोडवी—
वृक्षवल्लरीच्या संसाराला फुटे नवी पालवी ॥

बघ गवाक्षातून कोसळती
आषाढाच्या पहिल्यावहिल्या जलधारा—
आभाळाच्या जळकुंभातल्या
पायसदानाच्या नव्यानव्या अमृतधारा—
दोनचार दिसांनी होईल भूमी कंच हिरवी शानदार
होता रोमांचित तनु शहारले अंग
प्रियेच्या तनुवरी शाल सुखाची उबदार ।
हवी हवी ती मज उब कोसळत्या
धारांत घरात असणारी—
असावी अंगावर शाल उबदार
असावी नित तू मजजवळी प्रीतबावरी ॥

सावर गे सावर सखये
मधुबनात अनामिक फिरतो का अनामिकेसंगे
दिनपर्णांची रास संपली
परिस्थितीची दास जाहली—
दास्यातून ती नवी उभारी
नव्या दिसाची नवी दिशा नवे अंकुर नवी धुमारी ॥

[घाटकोपर
१२ सहा ८४ ]

¤

वीस

## रेशीमधागे

रेशीमधागे आसवात भिजले ।
स्वप्नफुलांच्या पाकळीतले दव देवाघरी धावले ॥

अरुण उदयाचली येत होता—
प्रणयपंढरीचा वारकरी आळंदीला जात होता
'ते माझे घर', 'घरकुल' सानुले
फुलपाखरा प्रीतीच्या पंख तुझे कापले ।
नाही कुणी कुणाचे—
'केलास इशारा जाता जाता' मजला
सजणा सया बाळ माझे तुला बिलगले ।
एक राहिली उरलीसुरली सविता निशाणी
तुझ्या माझ्या सुरेल गीताची अखेरची निशाणी ।
दिलरुबा थांबला, सरली सनई, गझलगीत संपले ।
दःखनची राणी राजासवे
अरुण सरनाइकांची नायिका, अखेर सारे जमले
नियतीचा तो डाव अखेरचा
श्वास तुजसंगे विरला सासरचा
आले आले तुकाज्ञानदेवा,
अजोड जोडीत अढळपदी सामावले ॥

माझी लाडकी कन्यका
सांग मजला पुसेल
'पप्पा सांगा कुणाचे'

उत्तर काय देऊ तिजला ॥

'पप्पा माझ्या मम्मीचे' ।
सरकार स्वारीची सरनौबत झडता
सरनाइक सारे सरसावले ।
सारे प्रीतीचे अमोल धागे
आज स्वप्नकोषी अधुरे राहिले ॥

वसन माझे भिजले अंगअंग थिजले
उरलेसुरले आसू माझ्या कन्येकरिता
नयनशिंपलीत पुनः खळखळले ।
खळखळ ही कशास्तव
कुणास्तव कुणीतरी भाग्य रेखिते ।
एकटी एकली माझी ममता
गीत अपुले अपुरे राहिले ॥

[कै. अरुण सरनाइकांच्या अपघाती मृत्यूवर ]

[पुणे-मुंबई दख्खनच्या राणीचा प्रवास
२६ चार ८४ ]

¤

एकवीस

## कलंदर मी शिकंदर मी

अनाम मी, कलंदर मी, शिकंदर मी ।
क्षणकणांचा वर्षाव—
क्षणोक्षणी कणाकणांची गारपीट—
कधीमधी हुरहुर शिशिराची—चाललीय पायपीट—
उधाण येते शब्दसागरा
शब्दांचे संगर—स्वरांचे तांडवनर्तन
सुखदुःखाचे सदाकदा आवर्तन—
अखेर पुनवेच्या राती पारिजात
ओसंडतो फुलांची आसवे
आम्ही असेच फुलणार असेच दरवळणार
मृद्‌गंध मातीबरोबर मिसळणार
होणार माती माझी, संपणार मीपण अन् मी ।
कलंदर मी शिकंदर मी ॥१॥

लाल हिरव्याशार वेळूच्या बनातून
येते नकळत कानी शीळ
शीळ सरते वाऱ्यासंगे, सूर मागे उरतात
'कोकिळ कलरव' येता कानी
ओठात आठवांचे अलगद वाजते अलगुज
हितगुज संपते, कुजबुज थांबते
थांब सखी मागे वळून तरी पहा—
तुझ्या प्रियांकाच्या ओठावरचे हसरे चांदणे—
तुझ्या गालावरी गोबऱ्या शिंपीत जा ।
फुलवीत खुणांची कोंदणे

स्वप्नातले ते ओले आठव
तुझ्या माझ्या भेटीतले आठव ते मऊ मुलायम क्षण
नाव असूनही अनामिक मी
कलंदर मी शिकंदर मी ।।२।।

जगज्जेत्या शिकंदरने जिंकले जग
जिंकायला काही नाही उरले म्हणून आसवं गाळीत होता तो—
आम्ही शब्द व स्वरसृष्टीचे अनभिषिक्त सम्राट
काठोकाठ भरलेले
शब्दस्वरांचे घट—रिते करतोय प्रतिभादेवीच्या राउळात—
क्षणात येथे क्षणात तेथे
क्षणाकणांची करितो किमया कर्णाची ह्या अथांग सागरात—
आम्ही शब्दसागरातले नव्या मनूचे
नव्या मातीचे सैनिक
साजिंदे स्वरसम्राटांचे पाईक
शिकंदराने जग जिंकले
आमचे जग त्या जगाहून आगळे
निळ्या निळ्या आभाळातून
कल्पनांचे जग जिंकतो जगावेगळे ।
कलंदर मी शिकंदर मी ।।
अनाम आम्ही अनामिक आम्ही ।।३।।

[घाटकोपर
६ सात ८४ ]

¤

बावीस

## जागरण

स्वप्नातल्या मिठीत नकळत जाग आली
आले आले भाग्य माझे उदयास आले ॥

उधळीत उषासुंदरीचे किरण
गुलाबी गालावरी ती प्रणयलिपीची अक्षरे—
अक्षय आठवांच्या मागे धावता जाग आली ॥

उगाच होते काम नसता उभी गवाक्षात सामोरी
स्वप्नातल्या आलिंगनी साक्षी आरसा बिलोरी
लबाड डोळे जड जाहल्या पापण्या—
गुंतलेल्या मनाने शिंपता चांदणे, नीज गेली ॥

सारी सारी वसने होती अस्ताव्यस्त
तू आला नसता तर—
पहाटे पहाटे लागला डोळयास डोळा
मत्तमयुरीसंगे जागता प्रीतमयूराने सातरंगी मिटला डोळा
तुझा पिसारा होते कुरवाळीत
कचपाशबंधन सुटले सारे कुरळे कुंतल—
सोडविता गुंता आज अचानक जाग आली
स्वप्नातले जागरण—सारे जाग येता
हाय हाय—होते पहाटेचे स्वप्न—

[टोपाझ, पुणे १७ सहा ८४]

तेवीस

## कसे घडले कोठे घडले

कसे घडले कोठे घडले
नकळत दारी तुझे पाऊल वाजले ॥

क्षण एक करितो ही किमया
मोहमयी माया अन् ममता
अमरबंधनात गर्भरेशमी कोष गुंफले ॥

क्षणाकणांचा हा सुरेल संगम ।
सुखी संसारीची ही सरगम ।
ओठी अवचित गीत साकारले ॥

अनुराग हा कुणी छेडिला—
गुणगुणत मी साजशृंगार केला—
कळत नकळत मी तुझी जाहले ॥

कानी येता तुझा पदरव
रोमांचित तनु माझी शहारले अंगअंग—
अमरकोषात प्रणबंधनी मी सरले, मला विसरले ॥

[ बसप्रवास
१२ सात ८४ ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २६००
काव्य
(स्थळ प्रत)

चोवीस

## घर आणि घरघर

घर कुणाचे कुणा न ठावे, नाही येथे कुणा ठावाठिकाणा—
हा सारा विशाल जनसागर, उगा खळखळतो, नसता ठाणा—
नसता अंत, नसता कशीच खंत, येथे नाही थारा कुणा—
उगीच नारे वाजती वैभवांचे—पडल्या अनंत कोनशीला—
फत्तरात काळ्या निज घेतो अंधारी पाझर—
इथे आहेत कोन अनंत—अंतकाळ नावाची केवळ शिळा—
नाही इथे विसावा नाही घर नाही निवारा—
रांगेमध्ये आडव्या कुड्या, वाट पहाती अग्निनिवारा— ॥

जनना जन्म देता—इथे ठरते ते मरण—
इथे सरले सारे उजाड जाहली वनेवासुरे
नाही वारा, सागर गरजे दिनरात, उधाणवारा
येथे केवळ उरली शब्दहीन खळखळ नाही
याला अंत नसे किनारा ॥

आभाळाच्या लेकरा नाही घर—दगडाच्या देवळी नीज घडिभर
घर नाही घर, बेघर कसा संसार, फुका घरसंसार
नाही मायघर, नाही शेजघर, सारे बाकी बंदरपट्टीवर
नाही मधुकरी मायमाउलीचा नसे तुकडा सरली ओसरी
पाऊस ओलाचारा साऱ्यांचा सरता सुकाळ
आता उरला केवळ दरवाजा बंद
तयाच्या आत ऐकू येतात आकांत, बाळ घुंगुरवाळे
अन् आर्त आरव—
जुन्या बंगलीतली फुटलेली शामदाने तावदाने
अन् अवसपुनवेला पैजणांचे रुपेरी पदरव—

सईबाईचा कोंबडा फिरतो उकिरड्यावर
सारी रडारड, वर विमानाची घरघर
खाली चालली सारी परवड—आता उरली घरघर ॥

इथेच होते पाकघर अन्नपूर्णाबाईचे
टिपत होते दाणे कोंबडे सईबाईचे—
माहेरवाशीण सासुरवाशीण
सूनबाई न विसरे अन्नपूर्णेला—
दही हातावर, मीठ मिरच्या, खोबरे
पाकवड्या लाडू मिळाले इथे कित्येक श्रीमंताला
अन्न हेच पूर्णब्रह्म त्या अन्नब्रह्मात
वाढल्या चिऊकाऊ आज सरला चिमणचारा
नाही याला अंत, ना निवारा, ना वारा—नसे किनारा ॥

गावागावात पेठेपेठेत होता वार सोमवार ते रविवार
हिरव्या चुड्यातले हात केशरी पाहिले इथेच मी वारंवार ।
आता हाती नाही बळ, पायी नाही बळ
नाही कळकळ—हाती नाहीत बिलवर
पाटल्या सोनियाच्या—
हात भुंडे, कुंकू गेले—टिकल्या आल्या खोट्यानाट्या
आठवती ते दिन सोनियाचे—इथे उरले
सारे वैभव बेगडे
वाडे जळले, माड्या आल्या मोडकळीला—
नाही राहिला निवारा पावसाळी—पानगळीला—
घर नाही घर, घरही नाही दारही नाही
ऊस दगडावरी, मिळेल तुकडा कधी भाकर
उघडे डोळे मिटतील कधीतरी—
मायदेवा आहे निदान आभाळाची साथ वरी
आता आहे बंद दरवाजा—त्यावर वाढलेला पिंपळ-
मिटलेल्या पापणींची दारे—बंद दरवाजे—
उरी केवळ घरघर ॥

[ घाटकोपर
१५ एक ८५ ]

पंचवीस

## पान पिकलं तरी

पान पिकलं तरी अजून देठ हिरवा ।
लाल कंदील हलवा, हलवा कंदील हिरवा ।।

देह देवाचे मंदिर । राधामाधवाचे राऊळ ।
या देवळात मिणमिणते पणती पिरतीची ।
रानावनात हिरव्यागार रानात भिरभिरत फिरतो काजवा ।
लाल खंदिल हलवा ।।

अजून 'जून' संपला नाही । सेंट जूजचा सुगंध दरवळतो ।
दोनी हातात माळशी गजरा । कधीमधी दरवळतो मरवा ।
मीरामधुरेचा माधव बरवा । सजणा पान पिकलं तरी अजून देठ हिरवा ।
मोसम नसता मधुवंतीला
माळिते मरवा मोगरा । पान पिकलं तरी अजून देठ हिरवा ।।

मीरा मधुरा मादक लवंगिका नयन शराबी ।
गाली गुलछन फुलते कळी पाकळी गुलाबी ।
केशरी सोनचाफ्यावरी छेलछबेली गुलाबी शानदार
काट्याकाट्यावर, अंगाअंगावर रंगत रंगते शानदार ।
नाजूक मी नार ठसकेबाज, नटखट मोगरीला आला साज ।
बाज करकरते, रात पुनवेची कुरकुरते । रतिमदनाचा माज मादक ।
पायी नुपूर झुमकेदार ।
नजर धारधार वरी चांदण्याचा दरबार
कोण्या गावची गोरा—कवण्या गावी चालली ठुमकत मानिनी मधुरा ।
मीरा मधुरेसंगे संग करितो मथुरेचा माधव ।

मथुरेचा माधव बरवा । तरीही राया लाल खंदील दावा ।
सातसुरांची मैफिल रंगविली तुझ्या पायाशी ।
दोन उभार कबुतरांची घुमारी तुजवरी करी गुटर्र गुटर्र गुम ।
नयन शराबी गाली गुलाबी । अंगाअंगात, नसानसात मदनबाण लागत ।
खाणाखुणा काटे तयांचे तुजवरी ।
रतिमदनांचा डाव रंगला ।
रंगला ओठी तुझ्या विडा, रंग माझा उरी फसला ।
डसल्या त्या शाणाखुणा मजवरी का उगा तिढा ।
भर उन्हात हवा हवा मज मदनगारवा ।
पिरतीचा घुमतो पारवा ।
रंगारंगी आरमपानावरी चंदनगारवा ।
पान पिकलं तरी ॥ अजून देठ हिरवा ॥

[ बसप्रवास
६ सात ८४ ]

सव्वीस

## चंद्र कलारंगाचा

चंद्र कलेचा वाढतो दिसादिसाने—
प्रियदर्शिनीच्या प्रतिमांच्या प्रदर्शनी समर्थ कलेचे दर्शन—
सारेगमपधनीसा सात सुरांची सरगम—
सात रंगांची सुरेख उधळण—
प्रतिमा–प्रतिभेच्या पथिका राहू नको तू गाफिल—
रंगसंगतीची इथे जुगलबंदी, शब्दस्वरांची जुळली मैफिल—
शांतसागरावरी कधी भरती कधी परती—
दिसादिसा निशा देते आकार—
वाऱ्यावरची वरात इथे चालली—
नवे रंग, फिरत्या रंगावलीत होती साकार ॥

[मंत्रालय जिमखाना
२ चार ८५ ]

सत्तावीस

## उंट

चौसुपी वाड्यातल्या माजघरी घेऊनी जन्मा—
'सेलर'च्या चाळीतल्या वाळवंटी वाढत होतो—
वाढता वाढता मज गवसले 'ओयॅसिस' वैभवी—
तुझाच तू वाढशी राजा—चाल तुझी तिरप्या उंटाची ।
आता आहे पोटभर भाकर पाणी—
एकला मी आलोय—एकलाच जाणार—
मृदगंधासह मातीस मिळणारा—
मी एक उंट—मी एक उंट ॥

[ वैभव, घाटकोपर
२० सात ८६ ]

अठ्ठावीस

## बा माणसा

बा माणसा तू भूतकाळात वावरू नको
भविष्याचा भरोसा देऊ नकोस ।
वर्तमानात सदा वावरावे—भूतकाळास सदा विसरावे—
जया जन्म तया मरण—जयअपयशाचे सदैव माजते इथे रण—
अपयशाची खंत तू बाळगू नको— ॥

अथांग सागरास सदानकदा न भरती—
भरतीपोटी सदैव असते उदईक ओहोटी—
आज भरती उद्या केव्हा तरी सेवानिवृत्ती—
अमावस्येच्या गर्भात पुनवेची चांदणी शर्बरी॥

भविष्याच्या आहारी तू जाऊ नको—
कसलाही कुणासही विसारा तू देऊ नको—
सदैव जाण असावी भल्याबुऱ्याची जाण असावी—
इथे नाही कुणी कुणाचे, जळते ओल्या बरोबरी सुके इथे रावास सदैव खुला दरवाजा—
होता रावाचा रंक तया बंद दरवाजा ॥

इथली झाकली मूठ सव्वा लाखाची—
गोठ लाख मोलाची एकदिस परी मातीस मिळण्याची ॥

[ चित्रनगरी, गोरेगाव
३० सात ८६ ]

एकोणतीस

## ओळख

नवथर झाली होती अपुली ओळख
पंख होते इवलाले
झेप असुनी गगनभेदी
नव्हती नियतीची ओळख पारख ॥

काळ चालला होता. वेडीवाकुडी वाट नागमोडी
पाढा होता नन्नाचा, नव्हत्या नोटा,
सुटी होती केवळ नाणी, अंगमोडी
नसता घरदार. पायपिटीच्या भयाण वाटा ।
उन होते, पाऊस ओलाचिंब, कधीमधी श्रावणधारा
आज आला दिन सेवापरतीचा
तरली सेवा तरीही मी अपुरा अपुरा ।
अवतीभवती ढग जमले प्रवास आठवांचा परतीचा ॥

आठवणींच्या आभाळात आहे कुठेतरी कुजबुज
आम्ही शिंपीत आलो चांदणे, तसेच जाणार
खळखळ करिते जुनी ओळख, जुनी ओळख
सुखनिवाऱ्याच्या वळचणीखाली ओलिचिंब ओळख ओळख ॥

[ मंत्रालय
३० नऊ ८६ ]

तीस

## कृष्णेच्या प्रवाहात

कृष्णेच्या प्रवाहात, क्षेत्र माहुलीत
पडल्या अस्थि तुझ्या ताई धवलजलात—
मानवजीवन नश्वर, जीवित हा अंगार
शांत होतो एकदाच—राखेत माखलेला संसार—
असार संसारावरचे वादळ—
हलता दळ पिकले पान—जातो घेउन काळ—
कणकण देह झिजविलास—
तुझ्या चंदनाची झीज मी पाहिलेली आहे—
आता त्या चंदनाच्या उगाळायच्या आठवणी—
तुझ्या अस्थि केव्हाच गेल्यात वाहून—
त्यावेळच्या माझ्या मनाच्या
खडकात आता आठवणींचे पाझर फुटतात—
झरणी झरझर झरते
कृष्णेचा प्रवाह बदलतोय—
दुथडी वाहणारी कृष्णा दिसते कोरडी—
माझ्यातला बदल मला कळत नाही—
काळ बदलत आहे—सुखाची सकाळ केव्हाच सरलीय—
दैन्यातली प्रखर दुपार पुरून उरलीय—सांजेकडे कललीय—
येईल नीरव शांतता अन् पुनवेचा पूर्णचंद्र, या प्रवासात—
आता केवळ लावितो श्रद्धेची सांजवात—
अक्षय अक्षरे रेखितो वात्सल्याची अक्षर प्रतिमांची सुरेख अन् सुंदर।।

[ घाटकोपर
९ तीन ७४ ]

एकतीस

## एकच गाणे

आई आई, एकच कण्हणे, क्षणाकणाचे एकच गाणे
माझे एकच गाणे— ॥
एक क्षणकळी फुलत होती, कणाकणाने झिजत होती
झिजे खोड तियेचे चंदनाचे बापुडवाणे— ॥

तारुण्याच्या ऐन बहरात वठला वात्सल्याचा पारिजात
ओसंडित आसवांचे एकच गाणे ॥

वत्सलतेची प्रतिमा सुंदर, रिते जाहले देहाचे मंदिर—
चंदन सरता, नाही देव देवता राउळी, उरले केवळ कण्हणे ॥

वास्तवाच्या कुडीत शिरता, मज कुशीत घेऊनी सांगावा केला—
आले तयांचे बोलावणे—आता उरले केवळ गाणे ॥
जवळ घेऊनी मजशी, शिकवलीस भल्याबुऱ्याची बेरीजबाकी
दिली करी विचारलेखणी हे मायलेणे
हे आईचे देणे—आई आई एकच गाणे ॥

[ घाटकोपर
३० तीन ८४ ]

बत्तीस

## बोबडे बोल

बोल बोबडे ऐकू दे मला, श्रीधरा ।।

रुप राजस लोभस हसणे ।
नकळत हसले मनी चांदणे ।
मिटता पापणी उरी झरती वत्सलधारा ।। श्रीधरा ।।

पदर पसरिते तुजजवळी ।
अंत पाहसी कुठवरी श्रीहरी ।
नयन शिंपिती आसू झरझरा ।। श्रीधरा ।।

जमले इथे तुझे सवंगडी ।
भास देशी कुठवर घडिघडी ।
नयनशिंपलीत जोजविन तुला ।। श्रीधरा ।।

तेहेतीस

## कदली वदे कुणाला

कदली वदे कुणाला—
वात्सल्याच्या वैभवात नाहते, एक निमिषात आसवांची माळ गळते ।
मनातले चांदणे ओवाळू कुणाला ।। कदली—

चांदण्यांची चंदेरी चादर, मायेचा तो ओलेता पदर—
चंद्र नसता चांदरातीचा चांदवा कुणाला ।। कदली—

कळत नकळत कदलीला फुल आले । मुलाफुलांशी नाते तिथेचे जुळले—
मायेच्या पंखात आसरा देऊ कुणाला ।। कदली—

येथे नाही संसार, संसारसागरा नाही उधाण—
एक कदली फूल जन्मता—संपली जननी न प्रसव
वेदना भयाण कधीही नाही तयाची वेदना कुणाला ।। कदली—

अनंत प्रसववेदना, वेदनातून जन्म अनंताचा ।
वासरा जन्म देता कामधेनुचे प्रयाण
गायवासरांची ताटातूट भयाण तयाची क्षिती कुणाला ।
मायेचा पदर ओलावू कुणाला ।।

येईल तो करी घेउनी सोनुली कुठार—बाळ माझे अलग होईल ।
सामोरी दिसताक्षणी अंधार—सामोरी आई नको कुणाला ।।

ओले आठवते ते दिन सोनियाचे हिरव्या पानामध्ये टपटपती थेंब सावलीचे ।
अगतिक आसवांची ओवाळणी, आभाळी निजलेली चंद्रचांदणीचा खेळ भातुकलीतला ।

सरता शर्बरी रुसली, रुसली कदली; पारिजात बहरला .
सांडतो ओसंडतो पारिजात फुलांची आसू माळा ।
हे सारे कुणाला सरितासागर मायेच्या ओटीत, अनावर एक शिंपलीसह कदली घेते किनारा ।
सरता ओहोटी, या बाजारी हवी भरभरून भरती सांजेला
घरकुलात-घरट्यातल्या पिलाला निवारा चिमणचारा ।।

वळचणीतले पाखरू, तया लाभले घरकुल, करू लागे कुहूकुहू—
कोकिळेस कंठ फुटला, कदलीला लाभला सागरी किनारा ।। कदली—

[ घाटकोपर
२५ तीन ८४ ]

¤

चौतीस

## केदार बाळ माझा

केदार बाळ माझा । केदार बाळ माझा ।।

एक कलिका उमलत होती—
स्वप्नगंधा, रजनीगंधा चवऱ्या ढाळीत होती
सरदार माझा दरकदार
अभिनव दरबार—करदार केदार माझा—
केदारनाथ माझा ।।

अनाथांचा अधार नवनाथ दरबार
रागरगिण्यांच्या सागरातले अनंत राग परिवार ।
आनंददायी राग केदार
अनुराग केदार, केदारबाळ माझा ।।

वैभवात या कलिका फुलली—
सारे सारे जमले, जमला बाळगोपाळ मेळा
अवघा आनंदी आनंदमेळा, कैलासनाथ माझा ।।

मम हृदयींची,
जीवनगीता गाता गाता—
सोनियाच्या दिशी, चंदनाच्या पाळण्यात—
जोजवित तुला, कुणी छेडीली सतार—
असार संसारी वत्सलवीणा छेडित झंकार—
अमर हा आनंदमेळा ।। केदारबाळ माझा—

आदिनाथ, नवनाथ, कैलासनाथ
शिवनाथ अनाथांचा आधार ।
निराधारांचा आधार—
यशोमंदिरी गीत गाधार माझा
—कैलासनाथ माझा ॥

[ घाटकोपर
गुढीपाडवा १९८४ ]

¤

पस्तीस

## अखेर मातीच माती

सत्यम्-शिवम्-सुंदरम्—मागे वळून तू पाहू नको—
स्वप्नातल्या कुंदकळ्यांना हात तू लावू नको—
स्पर्श तुज होय वैफल्याचा—
सुखक्षणांचा पसरला अमोल ठेवा सदैव साचा—
सुखक्षण स्वप्नात साठवावे,
स्वरुप अरुप तया आठवावे—
आभाळ हे सामोरी अक्षय झिजणाऱ्यांचे
ओझे डोईवरचे आता झाले खांद्यावरचे—
जू मानेवरी—हे सारे तुझे न माझे—वरचे वरचे—
अक्षय नाही येथे काही
क्षयासंगती तू अक्षय मजसांगाती—
गीता गाती—गीता गाती—
सरता इथला संसार—संपता सारी नातीगोती—
दोन जोडव्यात दडलेली—सात पावलात भरून उरलेली अतूट प्रीती—
माझी माती—माझी माती
अखेर मातीच माती ॥

[ घाटकोपर
२६ एक ८७ ]

छत्तीस

## मन उदास उदास

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६००
क्र. २६.०९.९५
१९२१८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

मन उदास उदास—
तुझा सहवास—तुझा सहवास—
अशीच राहू दे उदंड आस—उदंड आस—
सुखक्षणांची इथे पसरली रास—
पसरली रास—
कळत नकळत फुललेले गुलाब
आठवांच्या मिठीत मिळून मिसळून जातात—
त्यांचे मउ मुलायम
काटे अजूनही हृदयात रुततात—थरथरतात—
आजही त्या जपून ठेवलेल्या गर्भरेशमी आठवणी
खुणेचा हुंकार देतात—
आता उरलाय केवळ आठवणींचा खेळ—
सुकलेल्या आठवांचा उरलाय पोरखेळ—
आठवणींच्या आधीच हरपलय मनाचे फुलपाखरू
हाती उरलाय दिलरुबा—तुटलेल्या तारा
साथ कशी करू—
संसारात सारे असेच सरतात
सरकत्या सावल्या सरसर सरसर सरकतात—
वाकुल्या दाखवितात—एकटेपण आणतात
मन उजाड उजाड। सुखक्षणांची बरसात
उनपावसाची पाऊलखूण ठेवतात—मन उदास उदास ॥

[वैभव, १९ बारा ८६]

सदतीस

## चांदणे

आकाशीचे चांदणे भूवरती आले ।
लाजाळूच्या झाडाला गुलाबफुल की हो आले ॥

सरोवराच्या काठावरती स्वप्नसुंदरी,
अनुपम सौंदर्याची पुतळी अवतरली भूवरी
पदराते सावरी उषासुंदरी, हिमरवरी चंदनकेशरी स्वप्नी आले ॥

तुझ्या माझ्या मनातली कुजबुज, आकाशीच्या चांदण्यांशी हितगूज
अलगद अलगुज ओल्या आसवांतून हसरे चांदणे शिंपित आले ।
सुरपारंब्या खेळताना, आंधळी कोशिंबिरीचा डाव रंगला ।
उगाचच आठवांनी ओठ रंगता, रंगिन वढाळ
जीवनास उधाण की हो आले ॥

[ घाटकोपर
१६ अकरा ८६ ]

अडतीस

## माझी मला विसरले

माझी मला विसरले, मी अशीच रोज येते—
अशी मी तुला पाहते ॥

निळ्या निळ्या आभाळी—
क्षितिजासवे माझी मीच एकटी—
नाही मजसी मायघर, नसे सासुर—
एकटी मी तुला पाहते ॥१॥

मी येता तुजजवळी, चंद्रचांदण्या मजजवळी
शब्दसुरांची तुझी जवळीक आगळी
एकरुपी पहाट तुवा बिलगते ।
माझी मला मी सावरते ॥२॥

रूपगंधा, स्वप्नगंधा, अन् रजनीगंधा
माझ्यासवे एकरूप जाहल्या—
शब्द तुझे, सुर तुझे—
केवळ झंकार माझे, मनोमिलना उषासुंदरी साकारते ॥३॥

मेंदीची माझी चाल मंदमंद—
पारिजात, रातराणीचा गंधचंदनी—बेबंद मी धुंदधुंद
शब्द साकारले, स्वररूप जाहले
नुपूर झंकारित माझी मी नुरले
राया, एकरूप मी तुझी जाहले ॥४॥

विरह दाटला उरी उमाळा, स्वप्नकोषी माझी मी नसता—
नजर लाजरी, पदर सावरी ओलीचिंब मी
नाहते, तुजसवे मी नांदते । माझी मला सावरते
अक्षय येथे काही नसता, कशी सावरू मजला प्रिया मी बावरते।
अशीच मी रोज येते ।।५ ।।

मऊ मुलायम मिठीत मिसळता,
गर्भरेशमी प्रणयाच्या गाठी सुटता,
गाठभेट ती नकळत होता,
तंग काचोळी उरी उगाच रुपते
माझी मी सदा लाजते, बावरते । अशीच मी रोज येते ।।६ ।।

[ वैभव
१३ सहा ८७ ]

¤

एकोणचाळीस

## कधीतरी कुठंतरी

कधीतरी कुठंतरी—भेटलेली होती—
ती जुन्या आठवणी विसरलेली आशावरी—
मनाला न सावरणारी—
आसवांचा मळा गुलाबी गालावर फुलवणारी
माझ्या मनाला सावरणारी—स्वतःला मात्र विसरून जाणारी
केव्हातरी कोण्या एका काळी—
तारुण्याच्या गवाक्षातून येत होता उधाण वारा—
स्वप्नकोषात होती स्वप्न हिमरवरी—
जशी चंदनाच्या पालखीत हिमगौरी साजिरी गोजिरी—
फडफडणारी कबुतरे तारुण्याची केव्हाच गेलीत उडून क्षितिजावरी—
आता मला सावरणार—आहे तरी कोण?
कधीतरी कुठंतरी फुललेलं शरदाचं चांदणं आठवायचंय—
आणि कधीतरी कुठंतरी थांबायचंय ॥

कधीतरी कुठेतरी भेटला होता तो—
सांगत होता—परवाच आणला मोगरीचा गजरा—
आठवणीत येतो अजून तिचा हसरा चेहरा—
आज तीही नाही—नाही आठवत तिचा चेहरामोहरा—
वाटेवरची ही अखेरची पहाट अशीच एकटी घालवायचीय—
कधीतरी कुठतरी थांबायचीय—आता फक्त वाट पाहतोय—
खिशात आहे उरलीसुरली माळ सुकलेली बकुळीची
तुझ्या-माझ्या आठवणीत पहाट घालवायचीय
"भारतमाते"च्या "गंमतजंमत"च्या पोस्टरवर
"प्रेम करू या खुल्लम खुल्ला"ची नवी जाहिरात चिकटायचीय—

तारुण्याची कबुतरे केव्हाच गेलीत उडून
आता स्वप्नकोषातच रहायचंय—
कधीतरी कुठंतरी कुणाच्यातरी खांद्यावरून जायचंय
आणि सरणावर नाते अखेरचे जोडायचंय ॥

[ घाटकोपर
२६ नऊ ८७ ]

¤

चाळीस

## अभिलेख स्पंदनाचा

ही एकटी दुपार
पाऊसओली अकेली दुपार
रुग्णशय्येवरी मना न आवर
ओढ तियेची खंत परी अनावर
आज आठवती ते दिवस
जेव्हा मांडियले संसारी चूल–बोळके
इंद्रधनुचे सप्तरंगी भिंग घेऊन आले प्रकाशलेणे
प्रकाशापुढती अंधार—अंधारा आधार किरणांचा
प्रवास प्रकाशवर्षांचा बारमासाची बारा मासपर्णे
रात्र काळी, कधी अंधारी, दिन काळा कधी कळीकाळाचा
अहर्निश चालली झीज अन् भर—
कधी कळी, कधी पाकळी, हंसरी गालावरी गुलाबी
शराबी पळभर—
गतस्मृतींची मऊ मुलायम मादक हृदयस्पंदने—
आठवणींचा  कार्डियोग्राम—
अंधाऱ्या ताजमहली यमुनेकाठी अजून आहे प्रतिबिंब प्रणयग्राम
प्रियापियांकांचे चंदनगारव्यातले जळलेले पुरून उरलेले जळधाम
आजची दुपार एकटी दुकटी
नाही—स्पंदनांना आरपार नेणारी ती दुपार—
केव्हाच टळून गेलीय—माझ्या प्रेतावरचे टाळूवरचे लोणी
खाऊन मला सोडून गेलीय
बाराची वेळ अवेळ टळून गेली कळलंच नाही मला
"आयसीयूसी"च्या तारांगणात होता फक्त अंधार
लिस्टरचा  सहवास—हृदयस्पंदनाभिलेखांची  चित्रमाला—

आयेषा, सुसन आणि इतर अनेक डॉक्टर कुगाडे, मोरे, कांबळे
आपापल्या कामाच्या वेळा साधत साधना करीत आहेत—
हृदयस्पंदनाभिलेखांची, स्वप्निल प्रणयाची माया ममता
वात्सल्याची सारी शिल्प वितळत होती धुक्यात—
धुक्यात हरवलेली वाट सरता सरता दुपार कलायला लागली—
कुठेतरी अज्ञात किरणांची तिरीप होती
क्ष किरण केव्हाच सरलेले होते—
दिवसाच्या सरकत्या सावलीबरोबर
हवा होता अंधाराला कवडसा
निळया निळया मोरपंखीचा मागोवा घेत होता आसरा
त्या सप्तरंगी कवडशात दिसल्या
कळया जाई, जुई, मोगरीच्या कमा सुमा बॉबीच्या
एकाकी प्रणयपंथावरच्या बांधावरच्या—
तुझे नि माझे मीपणच नव्हते
नव्हती चूल नव्हते बोळके, घरदार उघडे बोडके वरचे
फक्त एकाकी केकाटत होता जीवाचा आकांत—
इथे सुख क्षणाचे, डोंगर मेरूएवढे तरीही नाही तया खांत
हव्यास जगण्याचा, प्रदूषण जगविण्याची आस आगळी
ही जातकुळी आगळी वेगळी
तुझ्या नि माझ्या हृदयस्पंदनाभिलेखातील
आळणी वळणे काळे उभे आडवे छेद
या काळया बेटावरच्या निळया निळया आभाळाखाली
फक्त मी पाहतो "आरके"चे बॅनर—
आणि बाकी सारे—"राम तेरी गंगा मैली"—
छेदित हृदयस्पंदनाभिलेख
माझे जगणे या मातीवरच्या वैभवाचे
काही काळ "गुड डे टू यू माय डियर"—
इलेक्ट्रोकार्डियोग्राम आशीर्वाद हार्ट हॉस्पिटल—

[ घाटकोपर
५ सात ८७ ]

¤

एकेचाळीस

## टाळ, मृदंग, अभंग

विठ्ठल विठ्ठल, रंगारंगी पांडुरंग ।
टाळ, मृदंग, अभंग ॥

गीता गाती ज्ञानेश्वर
इच्छा बळी सर्वेश्वर
अवघा आनंदी आनंद नश्वर
आनंदाने नाहतो श्रीरंग ॥१ ॥ टाळ—

आनंदाने आठवावे भिजलेले अंगअंग
रंगारंगी श्रीरंग खेळ खेळतो
भावभक्तिचा मळा फुलवितो
वाळवंटीचा राणा यदुनाथ अभंग ॥२ ॥ टाळ—

तुज स्वरूप अरूप आठवावे
अंतरंगी तुज आनंदे खेळवावे—
मेळवावी भावभक्तीची सावली मायमाउलीची—
खेळ खेळे माझ्या पंढरीचा राणा
वाळवंटी नाहते पंढरी, ओलेचिंब अंग अंग
—अभंग टाळ मृदंग ॥३ ॥

वाट पंढरीची वहिवाट अनंताची
मनी वसावी निजस्वप्नी दिसावी—
वाट वैकुठाची अवीट गोड अवघा आनंदी आनंद
'दे दान सुटे गिराण'—

विराण वाळवंटी नको असंगाशी संग—
इथे सदैव संगर, नितप्रसंग—
नामसंकीर्तनी तुका जनी अभंग—
ज्ञानियाचे पसायदान, हेच टाळ,
हाच मृदंग, दंगलो आम्ही अभंग—
टाळ— मृदंग ऽऽ अभंग ॥४॥

[ घाटकोपर-मत्रालय-प्रवास ]
८ सप्टेंबर ८७ ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६००
दा. २६०७५
काव्य ७।१५८९
REFBK-0026015
REFBK-0026015

¤

## आगामी

**व्हीनलिन सहप्रकाशन**

**नाटके**
संगीत शुभकुंतला
प्रणयशीला
ईश्वर, इच्छा आणि बळीराजा
शब्द तुझे स्वर माझे
घर कुणाचं

**कादंबरी**
आभळाशी जडले नाते
ओठी अमृतधारा
माझी मला विसरले

**चिंतनिका**
काही क्षणिका काही कणिका
बारनिशी

**कविता**
अक्षर विनायक